शासकीय कार्यालयामध्ये अधिकाराचे प्रदान, सादरीकरणाचे टप्पे कमी करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०१८/प्र.क्र.४८/पाच
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२, दिनांक २५ मे, २००६.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. पीडीओ-१००७/प्र.क्र.९/१८ (र.व.का.), दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.५४/१८(र.व.का.), दिनांक ११ ऑगस्ट, २०१४.

<u>शासन परिपत्रक</u> :-

शासकीय कार्यालयात पारदर्शकता व गतीमानता आणण्याच्या दृष्टीने “महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५” हा राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील प्रकरण ३ करिता “शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम-२०१३” हे नियम दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ च्या अधिसूचनेद्वारे राज्यात लागू करण्यात आले आहेत. वरील अधिनियमाच्या कलम ९ व नियमांच्या नियम क्रमांक ६ अनुसार विभागात हाताळण्यात येणाऱ्या विविध विषयांचे स्वरुप, स्तर आणि महत्व विचारात घेऊन विभागाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

२. त्या अनुषंगाने संसदीय कार्य विभाग, मंत्रालय (खुद्द) मधील आस्थापना शाखेशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्यासाठी प्रकरण सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत :-

अ. क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम अधिकारी / प्राधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय	
१	विभागातील आस्थापनाविषयक सर्व बाबी	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव / प्रधान सचिव
२	विधानमंडळाचे अधिवेशन अभिनिमंत्रित करण्यासंबंधी / संस्थगित करण्यासंबंधी मा. राज्यपालांचे आदेश प्राप्त करणे व विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या तात्पुरत्या दिनदर्शिकेविषयक बाबी	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव / मा. मंत्री / मा.मुख्यमंत्री
३	अर्थसंकल्प व पुरवणी मागण्या सादर करण्यासंबंधी मा. राज्यपालांचे आदेश प्राप्त करण्याविषयक बाबी	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव / मा. मंत्री / मा.मुख्यमंत्री
४	विधानमंडळाच्या अधिवेशनाशी संबंधित सर्व बाबींचे समन्वय व त्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांना निर्गमित करावयाच्या सूचना	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव / मा. मंत्री / मा.मुख्यमंत्री

वरील स्तराबाबत, यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे उक्त स्तरांमध्ये योग्य ते बदल करण्यात येतील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१८०३१५१७४०२२६११५ असा आहे. हे हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikamdas N. Shikharame

Digitally signed by Tikamdas N. Shikharame
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=12c50633547b609d1eafa52a6f58635e0b53088462877241f83facа5a99dd3a6, cn=Tikamdas N. Shikharame
Date: 2018.03.15 17:42:18 +05'30'

(टि. न. शिखरामे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. मंत्री (संसदीय कार्य), मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा. राज्यमंत्री (संसदीय कार्य), मंत्रालय, मुंबई-३२.
३. अपर मुख्य सचिव (र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४. सचिव (संसदीय कार्य) यांचे स्वीय सहायक, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. उप सचिव यांचे स्वीय सहायक, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. नोंदणीशाखा, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. रोखशाखा, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. संगणक समन्वयक, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवडनस्ती.